# विधानसभेचं बिगुल नोव्हेंबरमध्ये

**मुंबई–** आगामी विधानसभा निवडणूक २०२४ चे बिगुल ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात वाजण्याची शक्यता आहे. दरवेळी प्रमाणे विधानसभा निवडणुका ऑक्टोबर महिन्यात न होता, नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. दिवाळी नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात आहे. त्यामुळे दीपावलीनंतर मतदान आणि मतमोजणीचे फटाके फुटण्याची शक्यता आहे.

यंदाची विधानसभा निवडणूक ऑक्टोबर ऐवजी नोव्हेंबर महिन्यातील दुसऱ्या आठवड्यात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात दिवाळी झाल्यानंतर मतदान प्रक्रिया होण्याची चिन्हं आहेत. तर १४-१५ नोव्हेंबरच्या सुमारास निवडणुकांचा निकाल लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

बारा ऑक्टोबरच्या सुमारास विधानसभा निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर होण्याचे संकेत मिळत आहेत. त्यासोबतच राज्यात आदर्श आचारसंहिता लागू होईल. त्यानंतर ४५ दिवसांच्या आत म्हणजे २६ नोव्हेंबरपूर्वी नव्या विधानसभेची स्थापना होणे अपेक्षित आहे.

सप्टेंबरच्या तिसऱ्या महिन्यात निवडणूक आयोग पत्रकार परिषद घेत विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात होती. परंतु तशा हालचाली सध्या दिसत नाहीत. विशेष म्हणजे ऑक्टोबर महिन्यात विधानसभा निवडणूक लागल्यास आतापासूनच प्रचाराचा नारळ वाढवावा लागेल. पावसाळा अद्याप सुरु आहे. याशिवाय, श्रावण, गणपती, नवरात्र, दसरा, पितृपक्ष आणि दिवाळी असे एकामागून एक सणावाराचे दिवस आहेत. या काळात विधानसभा निवडणूक नसाव्या, अशी बहुतांश राजकीय नेते आणि पक्षांची इच्छा आहे. मात्र महाराष्ट्र निवडणूक आयोग कधीचा मुहूर्त लावणार, याकडे सर्वांचं लक्ष आहे.

**भाजपच्या उमेदवार यादीच्या हालचाली**

दरम्यान, गणेश चतुर्थीच्या सुमारास राज्यातील पहिली उमेदवारी यादी जाहीर करुन आघाडी घेण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. २०१९ मध्ये भाजपच्या ताब्यात असलेल्या आणि यंदा एकनाथ शिंदे यांची शिवसेना किंवा अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसने दावा न केलेल्या जागांवर लवकरात लवकर उमेदवार ठरवण्याचा भाजपचा इरादा आहे. मागच्या वेळी थोडक्यात गमावलेल्या जागांवरील भाजप उमेदवारांना प्रचारासाठी पुरेसा वेळ मिळावा, हा भाजपचा मनसुबा आहे.

# भोकरला जुन्या वादाच्या कारणावरून भावकीत हाणामारी

**भोकर (वार्ताहर)–** तालुक्यातील भोकर येथे जुन्या वादाच्या कारणावरून शिंदे कुटुंबात झालेल्या हाणामारीत चौघे किरकोळ जखमी झाले. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

भोकर गावालगत शिंदे वस्ती येथे वडीलोपार्जीत जमीन वाटपाचा जुना वाद अनेक वर्षापासून न्याय प्रविष्ट आहे. तेव्हापासून नेहमीच कुरबुरी सुरू असतात. शुक्रवार दि.९ ऑगष्ट रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास झालेल्या भांडणांचे रुपांतर हाणामारीत झाले. सर्वजण शेजारी शेजारीच राहत असल्याने मोठा वाद झाला. यात चौघे किरकोळ जखमी झाले.

अनिल परसराम शिंदे यांनी दाखल केलेल्या फिर्यादीनुसार आरोपी हे भावबंद असून त्यांच्यात शेतीच्या कारणावरून जुना वाद आहे. कोर्टात केस सुरू आहे. आरोपी यांनी फिर्यादीस व चुलत भाऊ गणेश हरीभाऊ शिंदे यांना कोर्टातील केस मागे घेत नाही, या कारणावरून लाथाबुक्क्याने, हाताने व लाकडी काठीने, दगडाने मारहाण करून शिवीगाळ केली. दीपक कारभारी शिंदे याने फिर्यादी अनिल यांच्या डोक्यात लाकडी काठीने मारून जखमी केले.

याप्रकरणी सिताराम मारूती शिंदे, मनोज सिताराम शिंदे, सुवर्णा मनोज शिंदे, ओम मनोज शिंदे, दीपक कारभारी शिंदे, अनिकेत दिपक शिंदे, शुभम दिपक शिंदे, सविता दीपक शिंदे व मनोज शिंदे यांची श्रीगोंदा तालुक्यातील विवाहीत मुलगी ऐश्वर्या खेतमाळीस यांच्या विरूद्ध भा. दं. वि. कलम ११८(१), ११५(२), ३५२,३५१(२),(३),१८९(२), १९१(२),१९१(३), १९० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तर सविता किसन शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, आरोपी हे नात्याने भाऊबंद असून जुन्या वादाच्या कारणावरून परसराम बाबुराव शिंदे, राहीबाई परसराम शिंदे, अनिल परसराम शिंदे, सोनाली अनिल शिंदे, हरिभाऊ बाबुराव शिंदे, विमल हरीभाऊ शिंदे, गणेश हरीभाऊ शिंदे, अश्वीनी गणेश शिंदे, राधाकिसन बाबुराव शिंदे, मंगल राधाकिसन शिंदे, किरण राधाकिसन शिंद, अक्षय राधाकिसन शिंदे सर्व रा.भोकर व आंबी येथील हर्षदा शरद साळुंके आदींनी फिर्यादी सविता शिंदे व ओम मनोज शिंदे, अनिकेत किसन शिंदे यांना लाथाबुक्क्याने पोटात, पाठीत मारहाण केलेची फिर्यादीत म्हंटले आहे. वरील आरोपी भा. दं. वि. कलम १८९(२), १९१(२)१९०,११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल राजू त्रिभुवन हे करत असून त्यांना पोलीस कॉन्स्टेबल संतोष कराळे व पोलीस मित्र बाबा सय्यद हे सहकार्य करत आहेत.

# लसूण मसाला की भाजी?

**नवी दिल्ली –** रोजच्या जेवणात आपण सर्रास लसणीचा वापर करतो. अनेकदा तर आपले मसालेदार पदार्थ हे आलं - लसणीच्या पेस्टशिवाय पूर्णच होत नाहीत. त्यामुळे लसूण हा भारतीय जेवणातला अविभाज्य घटक आहे याबाबत कोणाचेच दुमत असणार नाही. लसणीबाबत एवढं सगळं बोलण्याचं कारण म्हणजे, मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या इंदौर पीठाकडे यासंदर्भात एक अजब प्रकरण आले, आणि हा शेवटी याचा निर्णय न्यायालयाने दिला.

आपल्या जेवणात मोठ्या प्रमाणात वापरली जाणारी लसूण ही भाजी आहे की मसाल्याचा पदार्थ? आपण कधी हा विचारच केला नसेल. पण याच मुद्द्यावरून सुरू झालेला वाद हा शेवटी न्यायालयात गेला. तब्बल ९ वर्षे या प्रकरणावर युक्तिवाद सुरू होता. आणि शेवटी न्यायालयाने या प्रकरणात आपला निर्णय दिला. मध्य प्रदेशच्या उच्च न्यायालयाच्या इंदौर खंडपीठाने लसणीला अधिकृतरित्या भाजी म्हणून मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे भाजी तसेच मसाला म्हणूनही लसणीची विक्री केली जाऊ शकते.

न्यायालयाच्या या निर्णयामुळे शेतकरी तसेच विक्रेते या दोघांचाही फायदा होणार आहे. राज्य सरकारच्या परस्पर विरोधी आदेशांमुळे बऱ्याच काळापासून सुरू असलेला वाद हा या निकालामुळे थांबला आहे. इंदौर पीठाने २०१७ मध्ये न्यायालयाने दिलेला आदेश कायम ठेवला. लवकर खराब होत असल्याने २०१७ मध्ये न्यायालयाने लसूण भाजी असल्याचा निर्णय दिला होता.

**काय आहे प्रकरण ?**

मध्य प्रदेश मंडी मंडळाने २०१५ मध्ये लसूण भाजी असल्याचे म्हटले होते. मात्र, नंतर कृषी विभागाने हा निर्णय बदलला आणि १९७२ च्या कृषी उपज मंडी समितीच्या नियमांच्या आधारे लसूण मसाला असल्याचे म्हटले होते. या निर्णयामुळे मध्य प्रदेशातील कोणत्या मंडईंमध्ये लसूण विकली जाईल हे निश्चित करण्यात आले. याचा परिणाम मध्य प्रदेशातील कमिशन एजंटवर पडला. न्यायालयाने आता म्हटले आहे की, लसूण भाजी आणि मसाला अशा दोन्ही प्रकारांमध्ये विकली जाऊ शकते. यामुळे त्याच्या विक्रीवर काही निर्बंध राहणार नाहीत आणि शेतकरी तसेच विक्रेते या दोघांनाही त्याचा फायदा होईल. या मंडळाची स्थापना ही शेतकरी आणि विक्रेते या दोघांच्या फायद्यासाठी करण्यात आली आहे. ज्यामुळे त्यांना आपल्या उत्पादनाचे चांगले मूल्य मिळेल. दरम्यान, कांदा, बटाटा आणि लसूण कमिशन एजंट असोसिएशनने सर्वात प्रथम २०१६ मध्ये या निर्णयाला आव्हान दिले होते.

फेब्रुवारी २०१७ मध्ये एकाच न्यायाधीशांनी या असोसिएशनच्या बाजूने निर्णय दिला. मात्र, व्यापाऱ्यांनी या निर्णयाला आव्हान दिले. व्यापाऱ्यांचे म्हणणे होते की, यामुळे केवळ कमिशन एजंटना फायदा होईल. जुलै २०१७ मध्ये मुकेश सोमानी यांनी या निर्णयाला आव्हान देणारी याचिका दाखल केली. यामुळे जानेवारी २०२४ मध्ये आणखी एक निर्णय आला आणि त्यात लसूण मसाला असल्याचा निर्णय देण्यात आला. लसूण व्यापारी आणि कमिशन एजंट्सनी मार्च २०२४ मध्ये या निर्णयाला आव्हान दिले. अखेर या प्रकरणाची सुनावणी न्या. एस.ए. धर्माधिकारी आणि न्या. डी. वेंकटरामन यांच्या खंडपीठासमोर झाली आणि त्यांनी २०१७ च्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. दरम्यान, व्यापाऱ्यांनी लसणीसाठी दोन्ही पर्याय मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

# दोन्ही पलटूराम मोदी सरकार पाडणार

## काँग्रेस ओबीसी अध्यक्ष कॅप्टन यादव यांचा दावा

**अहमदनगर (प्रतिनिधी)–** राजकारणात नितीश कुमार हे पलटूराम म्हणून ओळखले जातात व आता त्यांच्या जोडीला चंद्रबाबू नायडू यांच्या कुबड्या मोदी सरकारला आहेत. त्यामुळे येत्या एक-दोन वर्षात हे दोघेही मोदी सरकार पाडतील, असा दावा अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष कॅप्टन अजयसिंह यादव यांनी मंगळवारी येथे केला. मोदी सरकार पडल्यावर इंडिया आघाडी सरकार स्थापन करू शकते. मात्र मोदी तसे होऊ न देता नव्याने निवडणुका देशावर लादतील, असा दावाही कॅप्टन यादव यांनी केला.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभागाचा मेळावा नगरला झाला. यावेळी काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी, राष्ट्रीय समन्वयक मंगल भुजबळ व पदाधिकारी उपस्थित होते. केंद्रातील मोदी सरकार पाडण्याचे कोणतेही प्रयत्न इंडिया आघाडी करत नाही. मात्र, या सरकारच्या नितीशकुमार व चंद्रबाबू या दोन कुबड्याच हे सरकार पाडेल, असा दवा करून कॅप्टन यादव म्हणाले, यामुळेच केंद्राच्या यंदाच्या बजेटमध्ये निवडणुका होत असलेल्या महाराष्ट्र, झारखंड व हरियाणाला पैसे न देता केवळ नितीश कुमार व चंद्राबाबूला पैसे दिले आहेत. शिवाय मोदी स्वतःला देवता मानतात. अहंकार त्यांच्यात आहे, चारसो पार नारा संविधान बदलासाठीच दिला होता. त्यामुळे येत्या दोन वर्षात हे सरकार स्वतःच्याच वजनाने पडेल, असा दावाही यादव यांनी केला.

**सरकारने तो निर्णय घ्यावा**

महाराष्ट्रमध्ये मराठा समाजाने ओबीसीमधून आरक्षण मागितले आहे. यावर स्पष्ट भाष्य करण्यास यादव यांनी नकार दिला. महाराष्ट्रातील सरकारने याबाबतचा निर्णय घ्यावा. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी याबाबत मध्यम मार्ग काढण्याबाबत सुचवले आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी आता याबाबत निर्णय घ्यावा, असे यादव यांनी स्पष्ट केले. मात्र, आरक्षण मर्यादा ५० टक्केच्या पुढे देण्यासाठी जातीय जनगणना आवश्यक आहे, असे स्पष्ट करून यादव म्हणाले, जाती गणनाद्वारे प्रत्येकाची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक स्थिती समजेल. गरीब व श्रीमंत कोण हेही स्पष्ट होईल. त्यामुळे ज्याची जेवढी लोकसंख्या, तेवढे अधिकार त्यांना मिळतील. जाती गणना झाली नाही तर २०२६ मध्ये डीलिमिटेशन कसे करणार, असा सवाल करून ते म्हणाले, आम्ही सत्तेवर आल्यास जातनिहाय जनगणना करणार, मागास वर्गातील महिलांना आरक्षण देणार, पंचायत राज व्यवस्थेत आरक्षण देणार, क्रिमिलेयरची मर्यादा १२ लाख करणार, उच्च शिक्षणातही आरक्षण देणार, अशी ग्वाही त्यांनी दिली. दरम्यान, ओबीसी विभागाने विधानसभेच्या २७ जागा प्रदेश काँग्रेसकडे मागितल्या आहेत व त्यात त्यात नगरची जागा मंगल भुजबळ यांना द्यावी असे सुचवल्याचे प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी यांनी यावेळी सांगितले. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय अध्यक्ष यादव यांनी, ज्या उमेदवाराचे प्रत्येक बुथवर किमान दहा सदस्य असतील व बूथ स्तरावर संपर्क यंत्रणा आहे, अशांना पसंती दिली जाणार आहे. काँग्रेसचा निधी सिझ (जप्त) झाला असल्याने ज्या उमेदवाराकडे निधी आहे त्यालाही पसंती असेल. यासंदर्भात निरीक्षक तिरूमला (केरळ) प्रत्येक मतदारसंघात दौरे करणार आहे, असे त्यांनी आवर्जून सांगितले.

**दोघांची तक्रार करणार**

अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या ओबीसी विभागाची नगरमध्ये बैठक असताना व राष्ट्रीय अध्यक्ष आले असताना काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ व शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे हे या बैठकीकडे फिरकले नाही, याबाबत विचारले असता, यासंदर्भात ओबीसींचे प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे तक्रार करतील, असे राष्ट्रीय अध्यक्ष यादव यांनी स्पष्ट केले. मात्र, जिल्हाध्यक्ष वाघ काही काळ बैठकीला आले होते व नंतर निघून गेले, असे ओबीसी राष्ट्रीय समन्वयक मंगल भुजबळ यांनी सांगितले.

## पान १ वरुन

### ..तर लाडकी बहीण योजना थांबवू

राज्य सरकारने या २४ एकर जमिनीचा ताबा मिळवला आणि ती जमीन संरक्षण संस्थेला परस्पर दिली. याचिकाकर्त्यांचा दावा आहे की ती जमीन माझी आहे, आणि तिचा योग्य मोबदला राज्य सरकारने दिलेला नाही. या प्रकरणी न्यायालयाने राज्य सरकारला शपथपत्र सादर करण्यास सांगितले होते. त्यासोबतच याचिकाकर्त्याला समकक्ष जमीन किंवा दुसऱ्या जमिनीचा भाग दिला जाऊ शकतो का, किंवा याचिकाकर्त्याला पुरेसा मोबदला दिला जाऊ शकतो का? राज्य सरकार संबंधीत जमीन ही वनभूमीच्यारुपात निश्चित करण्यासाठी केंद्र सरकारशी चर्चा करणार का? या संबंधीचे शपथपत्र राज्य सरकारला दाखल करण्यास सांगितले होते. राज्य सरकारने शपथपत्र दाखल केले नाही, याचिकाकर्त्यांना मोबदला दिलेला नाही, त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या वकिलांन फटकारले.

### १०६ नगराध्यक्षांना मुदतवाढीची लॉटरी

आणि त्यानंतर जुलै २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली. या फुटीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील राजकीय गणिते बदलली आहेत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर नागरध्यक्षपदाच्या निवडणुकीची जोखीम नको म्हणून महायुती सरकारने विद्यमान नगराध्यक्षांना मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू होणार आहे.

यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये सुधारणा करण्यात येतील. राज्यातील नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका २०२१-२२ मध्ये झाल्या असून नगराध्यक्षपदाचा कालावधी अडीच वर्षांचा आहे. तो आता संपत असल्यामुळे हा कालावधी पाच वर्षाचा करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे मुख्यमंत्री कार्यालयाने स्पष्ट केले आहे.

**२८० शहरांचा कारभार प्रशासकांकडे !**

दरम्यान, राज्यात २४५ नगरपरिषदा आणि १४६ नगरपंचायती आहेत. या ३९१ छोट्या शहरांपैकी तब्बल २८० नगर परिषदा आणि नगरपंचायतीमधील लोकनियुक्त पदाधिकाऱ्यांची मुदत संपल्याने तिथला कारभार प्रशासकांच्या हाती आहे.

### श्रीरामपुरात राडा, पाच जखमी, सात जणांविरुध्द गुन्हा

फेकून मारुन आशा उईके यांना त्यांच्या आदिवासी समाजावरुन जातीवाचक शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली.

याप्रकरणी आशा अंजेश उईके यांनी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन अरफान शेख, हुजैप शेख, फिरोज फिटरवाला व इतर ४ ते ५ अनोळखी इसमाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरिक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

### राज्यातील सर्व २८८ जागा लढणार

सरकार बनवू, असे जरांगे पाटील म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांनी विनाकारण षडयंत्र रचून मराठा समाजाला टार्गेट करू नये, ते का म्हणून मराठ्यांचा एवढा द्वेष करतात? अशी टीकात्मक विचारणा त्यांनी केली. मराठा-ओबीसी यांच्यादरम्यान दंगल घडविण्याचा फडणवीस-भुजबळ यांचा डाव असल्याचा गंभीर आरोप जरांगे यांनी केला.

**जरांगे यांच्या टार्गेटवर भुजबळ-फडणवीस!**

आम्हाला आता पक्ष नको, आम्हाला नेता नको, आमच्या पोराबाळांचं हित हीच आमची जात असल्याचे नाशिकच्या मराठा समाजाने आज दाखवून दिले. नाशिक जिल्हा ही कुणाची खासगी जहागीर नाही. इथल्या सर्वसामान्य नागरिकांचा, शेतकऱ्यांचा आणि सगळ्या जातीधर्माच्या लोकांचा हा जिल्हा आहे, अशा शब्दात त्यांनी भुजबळांना लक्ष्य केले. भुजबळ यांनी आरक्षणाला कितीही विरोध केला तरी मराठा समाजाला आरक्षण देऊन जातीला मोठे करण्याचे मी काम करणार म्हणजे करणार, असे आव्हानही जरांगे यांनी दिले.

सत्ताधारी पक्षातही मराठा आमदार आहेत, त्यांच्याविषयी विधानसभेला आपली काय रणनीती असेल असा प्रश्न जरांगे यांना विचारल्यावर ते म्हणाले, जो आमच्या विरोधात बोलणार तो आमचा विरोधक असेल, जो जातीसाठी भांडणार त्याला आमची साथ असेल.

### संगमनेर, कोपरगाव, अकोले, शेवगाव, श्रीगोंद्याला नवे निरीक्षक

वाचक पोलीस निरीक्षक पोलीस अधीक्षक कार्यालय), मोरेश्वर पेंदाम (नगर शहर वाहतुक नियंत्रण शाखा ते सायबर सेल), बाबासाहेब बोरसे (जिल्हा विशेष शाखा ते नगर शहर वाहतुक शाखा), नितिनकुमार चव्हाण (वाचक पोलीस निरीक्षक पोलीस अधीक्षक कार्यालय ते आर्थिक गुन्हे शाखा), मोहन बोरसे (नियंत्रण कक्ष ते अकोले), किरण शिंदे (नियंत्रण कक्ष ते श्रीगोंदा), गुलाबराव पाटील (अकोले ते नियंत्रण कक्ष), ज्ञानेश्वर भोसले (श्रीगोंदा ते नियंत्रण कक्ष).

सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर (पाथर्डी ते भिंगार कॅम्प), योगेश राजगुरू (भिंगार कॅम्प ते नियंत्रण कक्ष), आशिष शेळके (सोनई ते कोपरगाव शहर), विजय माळी (कर्जत ते सोनई), कुणाल सपकाळे (नियंत्रण कक्ष ते अर्ज शाखा), रमिझ मुलाणी (नव्याने हजर ते कर्जत), मंगेश गोंटला (जळगाव येथून बदली आदेशाधिन ते जामखेड), गणेश वारूळे (नंदुबार येथून बदली आदेशाधिन ते वाचक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय शिर्डी), विवेक पवार (ड्रायल मॉनिट्रेनिंग सेल ते वाचक अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालय नगर), संदीप हजारे (शिर्डी ते वाहतूक नियंत्रण शाखा शिर्डी), कल्पेश दाभाडे (नियंत्रण कक्ष ते वाचक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय संगमनेर).

पोलीस उपनिरीक्षक शुभांगी मोरे (भिंगार कॅम्प ते लोणी), योगेश शिंदे (लोणी ते भिंगार कॅम्प), तुळशिराम पवार (नियंत्रण कक्ष ते बेलवंडी), प्रियंका आठरे (अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष ते भरोसा सेल), निवांत जाधव (नक्षल सेल ते व्हीआयपी प्रोटोकॉल शनिशिंगणापूर मंदिर), उमेश पतंगे (नियंत्रण कक्ष ते ड्रायल मॉनिट्रेनिंग सेल), गजेंद्र इंगळे (नाशिक ग्रामीण येथून बदली आदेशाधिन ते वाचक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयन नगर शहर), दीपक पाठक (नाशिक ग्रामीण येथून बदली आदेशाधिन ते वाचक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय शेवगाव), सतीश डौले (नाशिक ग्रामीण येथून बदली आदेशाधिन ते वाचक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय श्रीरामपूर), योगेश चाहेर (नाशिक ग्रामीण येथून बदली आदेशाधिन ते सायबर सेल).

### जातपंचायतीने केलेला दंड न भरल्याने कुटुंबाला वाळीत टाकले

सामाजिक बहिष्कार (प्रतिबंध व निवारण) अधिनियम २०१६ मधील जनतेचे संरक्षण कलम ३,५,६,७, भा.द.वि.कलम ३२३,५०४,५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हवालदार श्री. अडकित्ते करत आहेत.

# अनुराधा पौडवाल यांना लता मंगेशकर पुरस्कार

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत प्रदान करण्यात येणारे विविध पुरस्कार जाहीर झाले असून, यंदाचा म्हणजेच २०२४च्या 'गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार' ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना जाहीर झाला आहे.

आपल्या सुमधुर आवाजाने नेहमीच श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या अनुराधा पौडवाल यांचा आता मानाच्या पुरस्काराने सन्मान होणार आहे. या पुरस्कारासोबतच 'नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार', संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार, भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार, ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार, तमाशा सम्राज्ञी विठाबाई नारायणगांवकर जीवनगौरव पुरस्कारांची व बारा राज्य सांस्कृतिक पुरस्कारांचीही घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी नुकतीच केली आहे.

संगीत व गायन क्षेत्रातील सातत्यपूर्ण आणि अमूल्य योगदानाबद्दल ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना २०२४चा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार जाहीर झाला आहे. शास्त्रीय संगीतासाठी ज्यांनी आपले जीवन समर्पण केले आणि शास्त्रीय संगीत क्षेत्राची सेवा केली, त्या कलाकारांच्या योगदानाबद्दल दिला जाणारा २०२४च्या भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कारफ आरती अंकलीकर-टिकेकर यांना जाहीर झाला आहे. नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार २०२४साठी मराठी रंगभूमीवर कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या प्रकाश बुध्दीसागर यांना जाहीर झाला आहे.

संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव २०२४चा पुरस्कार श्रीमती शुभदा दादरकर यांना जाहीर झाला आहे. संगीत रंगभूमीसाठी दिलेल्या विशेष योगदानाबद्दल त्यांना गौरवण्यात आले आहे. संत साहित्यावर लेखन किंवा संतांना अभिप्रेत मानवतावादी कार्याबद्दल २०२४चा ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार संजय महाराज पाचपोर यांना जाहीर झाला आहे. तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगांवकर जीवनगौरव पुरस्कार २०२३साठी शशिकला झुंबर सुक्रे यांच्या नावाची घोषणा झाली असून, २०२४साठीचा पुरस्कार जनार्दन वायदंडे यांना जाहीर झाला आहे. तमाशा क्षेत्रात प्रदीर्घ सेवा केलेल्या ज्येष्ठ मान्यवर कलाकारास या पुरस्काराने गौरवण्यात येते.

# साखर आणि मीठामध्ये प्लास्टिक आढळले

**मुंबई–** भारतीय नागरिकांच्या जेवणात मीठ आणि साखर या दोन्ही गोष्टींना महत्त्वाचे स्थान आहे. घरात कोणतीही चांगली गोष्ट झाली की आपण लगेच देवासमोर साखर ठेवतो किंवा साखर वाटतो पण हीच साखर जर प्लास्टिकयुक्त असेल तर, आणि हो फक्त साखर नव्हे तर मीठ सुद्धा समुद्रातून उपलब्ध होणारे मीठ पण जर प्लास्टिकयुक्त असेल तर... हेच धक्कादायक सत्य अखेर समोर आलेले आहे. एका अभ्यासातून स्पष्ट झाले आहे की भारतीय रोजच्या आहरात प्लास्टिक सुद्धा खात आहेत. भारतात प्रसिद्ध ब्रॅडकडून विकल्या जाणाऱ्या साखर आणि मिठात प्लास्टिकचे बारीक कण आढळून आले आहेत. मोठे ब्रॅड असो किंवा छोटे ब्रॅड, पॅकेज केलेले आणि खुल्या पद्धतीने बाजारात मिळत असणाऱ्या साऱ्याच साखर आणि मिठात प्लास्टिकचे कण आहेत असे मटॉक्सिक्स लिंकफ्च्या रिसर्चमध्ये आढळून आले आहे. हा अभ्यास करण्यासाठी टेबल मीठ, सेंधा मीठ, समुद्री मीठ आणि स्थानिक कच्चे मीठ वापरले. तसेच ऑनलाईन मिळणारी आणि स्थानिक बाजारातील पाच प्रकारची साखर पडताळून पाहिली.

अभ्यासात या साखर आणि मिठामध्ये मायक्रो प्लास्टिक आढळून आले. यातील समाविष्ट असणाऱ्या प्लास्टिकचा आकार ०.१ मिलीमीटर ते पाच मिलीमीटर इतके होते. आयोडीन असणाऱ्या मिठात प्लास्टिक बारीक रेषेच्या स्वरुपात आढळून आले. टॉक्सिकस लिंकचे संस्थापक रवि अग्रवाल म्हणाले, मायक्रो प्लास्टिकचा हा अभ्यास विश्वातील प्लास्टिकची गंभीर समस्या आणखी अधोरेखित करण्यासाठी करण्यात आला आहे. साखर आणि मिठात अशाप्रकारे प्लास्टिकचे कण आढळून येणे मानवी जीवनासाठी धोकादायक आहे.

मानवी शरीरात जर आहारातून अशाप्रकारे प्लास्टिक जात असेल तर त्यांचा मानवी शरीरावर गंभीर परिणाम होवू शकतो. काही संशोधनात मानवी शरीरात जसे की फुफ्फुसे, हृदय, आईचे दूध यामध्ये प्लास्टिकचे काही कण आढळून आले आहेत. प्रत्येक भारतीय दिवसाला १०.९८ ग्राम मीठ आणि साधारण दहा चमच साखर खात असतो. याची आकेडवारी भारतात जास्त आहे. जगभरातील लोकांपेक्षा भारतात जास्त प्रमाणात साखर आणि मीठाचे सेवन केले जाते.

# प्राध्यापकांना ठोक मानधन

**मुंबई (प्रतिनिधी)–** शासकीय, खासगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवृत्त प्राध्यापकांना ठोक मानधन देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील चिकित्सालयीन आणि अतिविशेषोपचार प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापकांना करार पद्धतीने मानधन देण्यात येते. जास्तीत जास्त प्रमाणात प्राध्यापक उपलब्ध व्हावेत तसेच विद्यार्थी आणि रुग्णांना त्याचा लाभ व्हावा म्हणून एक विशेष बाब म्हणून सेवानिवृत्त अध्यापकांना एक ठोक रकमी मानधन देण्याचा प्रस्ताव होता. त्यानुसार आता उर्वरित महाराष्ट्रासाठी प्राध्यापकांना १ लाख ८५ हजार आणि सहयोगी प्राध्यापकांना १ लाख ७० हजार तसेच दूरस्थ क्षेत्रातील महाविद्यालयांसाठी प्राध्यापकांना दोन लाख आणि सहयोगी प्राध्यापकांना १ लाख ८५ हजार रुपये मानधन देण्यात येईल.